# मालेगाव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५

## जाहीर सूचना

मालेगाव शहरातील सर्व मतदारांना कळविण्यात येते की, मालेगाव शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ करिता २०/११/२०२५ रोजी प्रशासकीय प्रभाग क्र.०१ ते ०४ च्या प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आल्या असुन त्या पुढील ठिकाणी अवलोकनार्थ उपलब्ध केल्या आहेत.

१) प्रभाग कार्यालय क्र.०१, मोसम पुल, मालेगाव.
२) प्रभाग कार्यालय क्र.०२, आयेशा नगर पोलिस स्टेशन जवळ प्राथमिक शाळा, हजार खोली, मालेगाव.
३) प्रभाग कार्यालय क्र.०३, रविवार वार्ड, पांच कंदील, दगडी शाळा, मालेगाव.
४) प्रभाग कार्यालय क्र.०४, मौलाना ताहिर स्कुल, गयास नगर, मालेगाव.
५) मालेगाव महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.malegaoncorporation.org यावर देखील प्रसिध्द करण्यात आले आहे.

तरी याबाबत आपले काही सुचना / हरकती असल्यास त्या संबंधीत प्रशासकीय प्रभाग कार्यालयात दि. २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वा. पर्यंत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

टीप –

१) मतदार यादीबाबत हरकती घ्यावयाची असल्यास मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचेकडील दि. १६ जुलै, २०२५ नुसार वास्तव्याच्या पुराव्यासह मतदाराने स्वतः विहित मुदतीत नमुना-अ व तक्रारदारसाठी नमुना-ब मध्ये हरकती दाखल करता येतील.
२) हरकतदाराने विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या पुराव्यासह सादर करणे आवश्यक असेल.
३) कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रित यादींच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
४) विहित नमुन्यातील अर्ज नमुना अ व ब मनपाचे चारही प्रभाग कार्यालयांत उपलब्ध होतील.
५) मनपाचे संकीर्ण कर वसुली विभागात विहित शुल्क भरल्यास प्रारुप मतदार यादीची प्रत उपलब्ध करुन मिळेल.

ठिकाण : मालेगाव
दिनांक : /११/२०२५

(रविंद्र जाधव)
आयुक्त
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव